# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/०४/२०२५ (बुधवार)**

## चोरी करणारा आरोपी ३ तासात अटक, बेला पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक ०९/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन बेला येथे फिर्यादी नामे श्रीकांत नंदकिशोर मुंजे, वय ४४ वर्ष, व्यवसाय रंगनाथ बाबा मंदीर देवस्थान, सिर्सी मंदीर चे सचिव पदावर कार्यरत, रा. सिर्सी वॉर्ड क्र ०४ , ता.उमरेड यांनी फिर्याद दिली की, दिनांक ०८. ०४.२०२५ रोंजी रंगनाथ बाबा मंदीर देवस्थान सिर्सी येथील सप्ताहाचा हिशोब करून रात्री १०/३० वाजता फिर्यादी मंदीर बंद करून दिनांक .०९/०४/२०२५ रोजी सकाळी ०६/०० वाजता मंदीर उघडण्यासाठी आले असता मंदीरचे मेन गेट गेटला लागुन असलेला लोखंडी कुलुप तोडुन मंदीरचे समोर ठेवलेली लोखंडी दानपेटी वर लावलेला कुलप तोडुन अंदाजे २,०००/—रूपये नगदी कोणीतरी अज्ञात ईसमानी चोरून नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून अज्ञात आरोपी विरूध्द अपराध क्रंमाक अप क्र. १६०/२५ कलम ३०५(ड), ३३१(४), भा.न्या.सं कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

बेला पोलीस हे आरोपीचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदाराच्या माहीतीवरून बेला पोलीसांनी गुन्हा नोंद झाल्यावर अवघ्या तीन तासात आरोपी **नामे सुनील श्रीकृष्ण घरत , वय २८ वर्षे रा. पिराया ता.भिवापूर जिल्हा नागपुर या** आरोपीस अटक करण्यात केली. आरोपीकडुन सदर गुन्हयात चोरी केलेला संपुर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपी हा मुळचा मौजा पिराया ता.भिवापूर जिल्हा नागपुर येथील रहिवासी आहेत. तसेच त्याचेवर पो.स्टे. भिवापुर व उमरेड येथे घरफोडी चे अनेक गुन्हे दाखल आहेत. पुढील तपास बेला पोलीस करीत आहेत.

## अवैधरीत्या गांजा (मादक पदार्थ) बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ०८/०४/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फतीने खबर मिळाली की, टेकडी येथे हर्षल दत्तराज डांगोरे नावाचा इसम अवैधरित्या गांजा बाळगुन त्याची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस टेकाडी ,महाजन नगर ,कन्हान येथे गेले असता आरोपी **नामे हर्षल उर्फ प्रविण दत्तराज डांगोरे वय २३ वर्ष ,रा. टेकाडी , महाजन नगर कन्हान ता. पारशिवनी मिळुन आला**. पंचासमक्ष त्याच्या घराची झडती घेतली असता त्याचे घरात गांजा मिळुन आला. **९०६ ग्रॅम गांजा व गांजा भरण्याकरीता असलेली प्लास्टीकची पिशवी १० ग्रॅम असा एकुण ९१६ ग्रॅम वजनाचा मुद्देमाल किमती ९०६०/— रूपयाचा गांजा जप्त करण्यात आला आहे.**

आरोपी विरुध्द पोस्टे कन्हान येथे येथे कलम ८ (क), २०(ब) गुंगी कारक औषघद्रव्य आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **सदर गुन्हयात आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## अकस्मात मृत्यु

**पो.स्टे. मौदा** :— दिनांक ०८/०४/२०२५ चा ०४:३० वाजेच्या सुमारास यातील मृतक कैलास गोपाल प्रगट, वय ४५ वर्षे, रा बोरगाव जाखेगात ता कामठी हा **बोरगाव येथील उमराव क्षिरसागर यांचे शेतात बकरी चारणे करीता गेला असता अचानक मृतक यांचे अंगावर विज पडल्याने त्यांचा मृत्यु झाला.**

फिर्यादी नामे सुधाम बळवंत प्रगट वय ४७ वर्षे, रा बोरगाव जाखेगाव, ता कामठी ांच्या तोडी रिपोर्ट वरून सदर प्रकरणी मर्ग दाखल केला असुन पुढील तपास मौदा पोलीस करीत आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**